सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

Ph. :0253-2230580, http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac

नोंदणी कक्ष

जा.क्र. : नोंदणी/२०२०/204 दिनांक : १५.११.२०२०

सूचनापत्र - १४

ऑनलाईन प्रवेश आणि प्रवेश शुल्क दोन टप्यात भरण्याच्या विशेष सवलतीस मुदतवाढ.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी विविध शिक्षणक्रमाचे ऑनलाईन प्रवेश दिनांक २१ जुलै २०२० पासून सुरु झाले होते. ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी दिनांक १५ नोव्हेंबर २०२० पर्यंत मुदत देण्यात आली होती. संपूर्ण महाराष्ट्र राज्यभर सुरु असलेल्या "कोरोना" (कोव्हीड १९) या विषाणूच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर व अतिवृष्टीने महाराष्ट्रात झालेल्या नुकसानीमुळे असंख्य विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहीलेले होते. या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये या सामाजिक बाधंलकीच्या जाणीवेतून शिक्षणक्रमाच्या एकुण शुल्कापैकी विद्यापीठाचा हिस्सा दोन टप्यात भरण्याची विशेष सोय विद्यापीठाने दिनांक ०३ नोव्हेंबर २०२० पासून उपलब्ध करुन दिलेली आहे. या सवलतीत प्रवेश घेण्यास दिनांक ३० नोव्हेंबर २०२० पर्यंत मुदत वाढ देण्यात येत आहे.

जे विद्यार्थी टप्प्याने शुल्क भरण्याचा पर्याय निवडून प्रवेश घेतील त्यांना ३१ जानेवारी २०२१ पुर्वी दुसऱ्या टप्प्याचे शुल्क ऑनलाईन भरणे अनिवार्य आहे. दोन्ही टप्प्याचे शुल्क भरल्यानंतरच अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यात येतील.

Vmende

(श्रीमती. वंदना झेंडे)
सहायक कुलसचिव,
नोंदणी कक्ष.

(डॉ. प्रकाश देशमुख)
संचालक,
विद्यार्थी सेवा विभाग.